नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

NMRDA
नागपूर महानगर प्रदेश
विकास प्राधिकरण

विभागीय कार्यालय (दक्षिण), हनुमान नगर, नागपूर – २४
फोन.नं. ०७१२ – २७४४५२४

पत्र क्र. सहा.अभि.(द)/ना.म.प्र.वि.प्रा./12 नागपूर, दि.05/10/२०२१

प्रती,

सचिव
गट ग्रामपंचायत
मौजा–पांजरी (बु.) तह. नागपूर (ग्रामिण)
जि. नागपूर

विषय:–मौजा–पांजरी (फार्म) ख. क्र. ९४ या लेआउट मध्ये आपले सोबत केलेल्या करारनाम्याप्रमाणे हस्तांतरण करण्याकरीता अभिप्राय सादर करणेबाबत.

संदर्भ :–आपले पत्र क्र. आ./जा. १११९, दि. १५/०९/२०२१.

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अनुषंघाने कळविण्यात येते की, मौजा पांजरी (फार्म) ख. क्रं. ९४, तह. नागपूर (ग्रामिण) या अभिन्यासाचा विकास करारनामा दि. १८/०७/२०१९ रोजी निष्पादित झालेला आहे. विकास करारनाम्यातील अट क्रं. १७ नुसार विकासकाने अभिन्यासात मलवाहीका, पर्जन्यवाहीका, पिण्याचे पाण्याची वाहीणी, सिमेंट कॉक्रीट रस्ते, खुल्या जागेस संरक्षण भिंतीचे बांधकाम व मल–जल शुध्दीकरण संयंत्राचे बांधकाम मंजुर विकास नकाशानुसार पुर्ण केलेले आहे. तथापी मल–जल शुध्दीकरण संयंत्राचे भविष्यात देखभाल व दुरूस्ती करण्याबाबत दिलेले दि. २४/०९/२०२१ चे हमीपत्र सादर केलेले आहे. (प्रत संलग्न)

कळावे.


सहाय्यक अभियंता–१ (दक्षिण)
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधीकरण

प्रतिलीपी :– १) श्री. मच्छिन्द्र रामचंद्र कदम, राह. फ्लॅट नं. ४०२, दिनकर अपार्टमेंट धंतोली नागपूर–४४००१२.

२) श्री. विजय तिलोकचंद्र बोरंदिया, राह. फ्लॅट नं. ००१, यशोधाम एनक्लेच्छ, प्रशांत नगर, नागपूर–४४००१५.

सचिव
गट ग्राम पंचायत पांजरी (बु.)
त.जि. नागपूर

!! स्वच्छ गांव !! !! निर्मल गांव !! !! सुंदर गांव !!



गट ग्रामपंचायत पांजरी (बु.)

पंचायत समिती नागपूर, जि. नागपूर.



श्रीमती. किरण स. नगरारे
सरपंच

श्री. नकुल प्र. काकडे
उपसरपंच

श्री. आर. जी. टेकाळे
सचिव

ग्रामपंचायत, पांजरी
123
जा.क्र.
01/11/21

● सदस्यगण ●

श्रीमती. भावना अ. मेश्राम

प्रि. जगदीश के. कुंभरे

श्री. रमेश के. बाराहाते

श्रीमती. अल्का बं. यादव

श्रीमती. कविता बं. कोराम

श्री. महेश ध. भोयर

श्री. गौतम श्री. कांबळे

श्रीमती. सोनाली मु. कोराम

श्रीमती. सुषमा स. आमले

दिनांक:.....

प्रति,

१) श्री विजय तिलोकचंद बोरुंदीया

२) श्री मच्छिन्द्र रामचंद्र कदम

रा. ४०२ दया चेंबर अजनी चौक

वर्धा रोड नागपूर – ४४००१५

विषय: मौजा पांजरी(बु.) ख. क्र. ९४ या ले आऊट अभिन्यास हस्तांतरित करण्याबाबत.

संदर्भ:

१) मा. सहायक अभियंता (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र.सहा. अभि / ना. म.प्र. वि. प्रा. / १२ दिनांक ०५/१०/२०२१ अन्वये.

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये कळविण्यात येते की आपल्या अर्जानुसार व मा. सहायक अभियंता (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र.सहा. अभि / ना.म.प्र. वि.प्रा./ १२ दिनांक ०५/१०/२०२१ रोजीचे पत्रानुसार मौजा पांजरी (बु.) ख.क्र. ९४ यांनी अभिन्यासातील विकास करारनामा मधील अट क्र. १७ नुसार विकासकामे मलवाहिका, पर्जन्यवाहिका, कोंक्रिट रोड, जलवाहिनी, मल-जल शुद्धीकरण सयंत्र व मोकळ्या जागेत सुरक्षा भितीचे बांधकाम पूर्ण केलेले आहे असे पत्रात नमूद आहे. वरील विकास कामे अर्जदाराने / जमीन मालकाने पूर्ण केल्यामुळे व ना. म. प्र. वि. प्रा. यांचे पत्राचे आधीन राहून सदर विकास कामाची देखभाल व दुरुस्ती यापुढे ग्रा.पं. करण्यास तयार आहे तत्पूर्वी पूर्ण भूखंडावर कर आकारणी करून देण्याची जबाबदारी अर्जदार / ले आऊट मालकाची राहील. जोपर्यंत प्लॉटधारकाचे नावाने टॅक्स लागत नाही तोपर्यंत ले आऊट धारकाचेच नावाने टॅक्स राहील व ले आऊट धारकानांच यासमोर टॅक्स भरणा करावा लागेल. व भविष्यात सर्व प्लॉटधारकाचे टॅक्स लावून देणे ले आऊट धारकावर बंधनकारक राहील तसेच ना. म. प्र. वि. प्रा. यांचे पत्रात नमूद बाबी व्यतिरिक्त इतर बाबी आढळल्यास व भविष्यात वाद निर्माण झाल्यास ती सोडविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित ले-आऊट धारक यांची राहील. ग्राम पंचायतची जबाबदारी राहणार नाही.

वरील अटी व शर्तीच्या आधीन राहून व विविध शासकीय विभागाच्या अटी व शर्तीच्या आधीन राहून दिनांक ३०/१०/२०२१ विषय क्र. ८/३ नुसार ग्राम पंचायत ले आऊट अभिन्यास हस्तांतरित करण्यास तयार आहे.

करिता सविनय महितीस सादर

सचिव
गट ग्राम पंचायत पांजरी (बु.)
ता.जि. नागपूर

प्रतिलिपी :

१) सहाय्यक अभियंता १ (दक्षिण) नागपुर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना महितीस सविनय सादर.